## महत्त्वाचे

### तामसवाडीत कृषिदूतमार्फत शेती तंत्रज्ञान प्रात्यक्षिक




**शनिशिंगणापूर (वार्ताहर)**– नेवासा तालुक्यातील तामसवाडी येथे भानसहिवरे येथील कृषी महाविद्यालयातील कृषीदूतांचे स्वागत करण्यात आले. श्रेयस नवथर, संदीप पाटील, उमेश साळुंके, श्रीकांत येणारे, पंकज बडे, सुशांत निशाणे या कृषिदुताचे स्वागत ग्रामविकास अधिकारी ज्योती कावरे, चंद्रकांत भोरे, गोरक्षनाथ कापसे, विशाल बेर्डे यांनी केले. या ठिकाणी १६ आठवडे शेतीबद्दल पीक पद्धती संशोधन, पिकावरील किड रोग माहिती, माती परीक्षण, अधिकाधिक होण्यासाठी शेतीविषयक मार्गदर्शन, किडीरोगाचे व्यवस्थापन, नैसर्गिक आपत्तीत उपाययोजना, सुधारित तंत्राचा वापर कसा करावा आदी विषयावर कृषीदूत मार्गदर्शन करणार आहेत. यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रकाश तूरभरमर, समन्वयक मनोज माने, प्राध्यापक सागर सोनटक्के, कार्यक्रम अधिकारी जयश्री खकाळे, प्राध्यापक संदीप सोनवणे यांचे विशेष मार्गदर्शन लाभणार आहे.

### द्रोणाच्या प्री प्रायमरी विभागाची साईतीर्थ थीम पार्कला भेट



**राहाता (तालुका प्रतिनिधी)**– तालुक्यातील साकुरी येथील द्रोणा स्कूलमधील प्री प्रायमरी विभागाची साई तीर्थ थीम पार्क शिर्डी येथे सहल आयोजित करण्यात आली होती. चिमुरड्या विद्यार्थ्यांनी या सहलीमध्ये छोटी रेल्वे प्रवास, छोटी मंदिरे, पक्षी, प्राणी, गणपती मंदिर, साईबाबांचे दर्शन घेणारे भक्त देखावा, बद्रीनाथ देखावा, प्राणी संग्रहालय देखावा, बालाजी मंदिर, कालिया नाग मर्दन देखावा, जादूचे प्रयोग, दोरीवरच्या उड्या, उंदीर डान्स, खेळ करामती, साईबाबा महिमा चित्रफित, लंकादहन चित्रफीत हे सर्व त्या ठिकाणी चिमुरड्या विद्यार्थ्यांनी अनुभवले. हे बघून सर्व विद्यार्थी भारावून गेले होते. या सहलीचा विद्यार्थ्यांनी मनमुराद आनंद लुटला, तो आनंद प्रत्येक चिमुरड्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता. साई नगरीत साई तीर्थ थीम पार्क मध्ये या चिमूरड्यांनी आगळा-वेगळा अविस्मरणीय अनुभव घेतला.

### बहिरवाडीतील शेतकऱ्यांना कृषिदूत करणार मार्गदर्शन



**नेवासा (तालुका प्रतिनिधी)**– तालुक्यातील बहिरवाडी येथे सोनई कृषी महाविद्यालयाच्या कृषिदूतांचे आगमन झाले. कार्यानुभवा बरोबरच ते शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. सरपंच आनंद नांगरे, उपसरपंच सौ. नंदा पंडित, ग्रामसेवक एस.बी.गिरी तसेच शेतकरी-ग्रामस्थ यांनी ओंकार घाडगे, ज्ञानेश हरिश्चंद्रे, सौरभ कल्हापुरे, निखिल तेलोरे, यश राशिनकर या कृषिदूतांचे स्वागत केले. हे कृषीदूत अडीच महिने बहिरवाडी येथे राहून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणी, त्यांचे जीवनमान, सामाजिक, आर्थिक स्तर, साक्षरतेचे प्रमाण, संबंधित गावातील पीक पद्धती, नैसर्गिक संसाधने अशा विविध गोष्टीचा अभ्यास विद्यार्थी करणार असून शेतकऱ्यांना माती परीक्षण, पाणी परीक्षण, विविध पिकांवरील रोग, किडींची व्यवस्थापन याबद्दल माहिती देणार आहेत. प्राचार्य डॉ. एच. जी. मोरे, उपप्राचार्य एस. व्ही. बोरुडे, समन्वयक डॉ. ए.ए. दरंदले, प्रा. जे. एम. वाघमारे, प्रा. आर. एस. गोंधळी व प्रा.आर. टी. दिघे तसेच विषय विशेषज्ञ यांचे मार्गदर्शन शेतकऱ्यांना लाभणार आहे.

# अभिनंदनाचा फलक लावल्याने आमदार खताळ समर्थकांना मारहाण

## आमदार खताळ यांनी जखमींची रुग्णालयात भेट घेऊन केली विचारपूस

**संगमनेर (शहर प्रतिनिधी)**– नवनिर्वाचित आमदार अमोल खताळ यांच्या अभिनंदनाचा फलक लावल्याच्या कारणावरून एकाला बेदम मारहाण केल्याची घटना रविवारी रात्री दहा वाजेच्या सुमारास घुलेवाडी येथे घडली. याबाबत पोलिसांनी चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या घटनेची आमदार खताळ यांनी गंभीर दखल घेऊन जखमींची चौकशी करून आरोपींविरुद्ध कारवाईची मागणी केली.

याबाबत शहर पोलिसांकडून समजलेली अधिक माहिती अशी, की गोविंद यादव पानसरे यांचा ठेकेदारीचा व्यवसाय आहे. पुणे जिल्ह्यातील पिंपरी चिंचवड येथे त्यांचे काम सुरू असल्याने मागील काही वर्षांपासून ते मोशी (जि. पुणे) येथे राहावयास आहे. अधून-मधून ते आपल्या मूळ गावी घुलेवाडी येथे वडील व भावाला भेटण्यासाठी येत असतात. रविवारी ते घुलेवाडी येथे आले होते. त्यांच्या भावाने व इतर मित्रांनी नवनिर्वाचित आमदार अमोल खताळ यांचा अभिनंदनचा फलक घुलेवाडी येथील मौनगिरी चौकात लावलेला होता. हा फलक काढून टाकावा असे काँग्रेसचे कार्यकर्ते ऋतिक राऊत व इतर आपणास सांगत असल्याचे त्याने आपल्या भावास सांगितले. यानंतर गोविंद पानसरे हे रात्री दहा वाजेच्या सुमारास आपल्या कारमधून



पुणेकडे जाण्यासाठी निघाले. गावातील मौनगिरी चौकात आल्यानंतर तेथे त्यांचा चुलत भाऊ प्रतीक भास्कर पानसरे, ऋतिक राऊत, प्रतीक राऊत व गावातील काही जण दिसले. गोविंद पानसरे हे चारचाकी गाडी रस्त्याच्या कडेला उभी करुन गणेश उर्फ प्रतीक भास्कर पानसरे याच्याकडे गेले.

यावेळी जवळच असलेले प्रतीक राऊत व ऋतिक राऊत यांनी गोविंद यांना शिवीगाळ सुरू केली. प्रतीक राऊत याने पानसरे यांच्या गाडीची चावी काढत बाहेर ओढून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. प्रतीक राऊत याने तेथे पडलेला दगड हातात उचलून तो उजव्या हाताच्या कोपऱ्यावर मारला. यावेळी दोन अज्ञात युवकांनी पानसरे यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. पानसरे यांच्या ओरडण्याचा आवाज ऐकून गाडीत बसलेला सुनीत प्रदीप डेरे याने भांडणाची सोडवासोडव केली. त्यानंतर ऋतिक राऊत, प्रतीक राऊत व गणेश उर्फ प्रतीक भास्कर पानसरे यांनी मला तुझ्या भावाला जास्तच झाले आहे, वारंवार मौनगिरी चौकातील फलक हटविण्यास सांगितले तरी त्याने हटविले नाही असे म्हणून यानंतर पुन्हा जर आमच्या नादी लागला तर तुमचे हातपाय नीट ठेवणार नाही अशी धमकी दिली. त्यानंतर तेथून निघून गेले. झटापटीत पानसरे यांच्या खिशात असलेले ३३ हजार रुपये गहाळ झाले. यानंतर गोविंद पानसरे यांना उपचारांसाठी दवाखान्यात हलविण्यात आले. याबाबत गोविंद पानसरे यांनी शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. यावरून पोलिसांनी ऋतिक राऊत, प्रतीक राऊत, गणेश उर्फ प्रतीक भास्कर पानसरे यांच्यासह दोन अनोळखी व्यक्तींविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

दरम्यान आमदार अमोल खताळ यांना या हाणामारीची माहिती समजताच ते जखमींना भेटण्यासाठी रुग्णालयात गेले. त्यांनी जखमीची चौकशी करत या घटनेतील आरोपींविरुद्ध कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.

## हॅकेथॉन स्पर्धेसाठी नावनोंदणी करण्याचे आवाहन

**संगमनेर (वार्ताहर)**– राज्यातील इयत्ता सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी राज्य संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्यावतीने हॅकेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. राजेश बनकर यांनी केले आहे.

विद्यार्थ्यांमध्ये नवनिर्मितीची मानसिकता निर्माण व्हावी. एकविसाव्या शतकासाठीच्या कौशल्यांची रुजवणूक व्हावी याकरिता या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी स्थानिक ते जागतिक स्तरावरील समस्या सोडविण्यासाठी त्यांच्या सृजनशील मानसिक शक्तीच्या माध्यमातून विविध स्वरूपाच्या प्रतिकृती, साहित्य निर्मिती करणे अपेक्षित आहे. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या प्रतिकृती, साहित्य यांचे जिल्हास्तरीय प्रदर्शन (हॅकेथॉन) डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यामध्ये आयोजित करण्यात येणार आहे. यामध्ये विद्यार्थी व त्याचे मार्गदर्शक शिक्षक यांचा सहभाग असणार आहे.

विद्यार्थ्यांनी प्रतिकृती, साहित्य तयार करून या उपक्रमामध्ये सहभागी होणे अपेक्षित आहे. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या प्रतिकृती, साहित्य याबाबत नोंदणी संबंधित वर्गशिक्षक, विषय शिक्षक यांनी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्यावतीने देण्यात आलेल्या लिंकवर करणे अपेक्षित आहे. या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी अंतिम दिनांक २५ डिसेंबर असल्याने नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या स्पर्धेत जिल्ह्यातील जास्तीत जास्त शाळांमध्ये शिक्षक व विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन लक्ष्मण सुपे, गणेश मोरे, रामेश्वर लोटके यांनी केले आहे.

### स्व. शंकरराव निमसे यांच्या पुण्यतिथीनिमित्त

## टाकळीमियात आयोजित शिबिरात ११० रुग्णांची तपासणी

**टाकळीमिया (वार्ताहर)**– राहुरी तालक्यातील टाकळीमिया येथील मियासाहेब ग्रामीण बि.शेती सहकारी पतसंस्थेची स्थापना स्व.शंकरराव निमसे यांनी १९९३ मध्ये केली. संस्था चालवत असताना त्यांनी दिलेल्या आदर्श नियमावलीनुसार आम्हीही कारभार करीत आहोत. संस्थेचा पारदर्शक व विश्वासाहार्य कारभार करीत असल्याने सभासद व ठेवीदार यांच्या सहकार्याने संस्थाने ३२ व्या वर्षात यशस्वी पदार्पण केले असल्याचे प्रतिपादन संस्थेचे अध्यक्ष शामराव निमसे यांनी केले. संस्थेचे संस्थापक स्व. शंकरराव निमसे यांच्या १८व्या पुण्यतीथी निमित्त त्यांना अभिवादन करण्यासाठी उपस्थित सभासदांना संबोधीत करताना बोलत होते.



निमसे म्हणाले, संस्था शासनाचे सर्व नियम पाळुन कारभार करीत आहे. सध्या स्पर्धेच्या युगात मोठमोठी आव्हाने समोर आहेत. परंतु जो पारदर्शक व विश्वासाचा कारभार करील तेच या स्पर्धेत टिकतील. त्या अनुषंगाने आम्ही सभासद, ठेवीदार व खातेदारांच्या विश्वासास कुठलाही तडा जाऊ दिला नाही. त्यामुळे पारदर्शक कारभार असल्याने ठेवीदांनी आमच्यावर विश्वास दाखवल्याने आज संस्थेकडे १५० कोटींच्या ठेवी पूर्ण होऊन १७५ कोटींच्या ठेवीसाठी वाटचाल चालु आहे. सर्वांच्या सहकार्याने संस्थेचा दरवर्षी चढता अहवाल म्हणजे आमच्या कामाची पावती असल्याचे ते म्हणाले.

स्व. निमसे पुण्यतीथी निमित्त आयोजित संगमनेर येथील नेत्रालय यांच्या वतीने मोफत नेत्रतपासणी व अल्प दरात मोतीबिंदु या शिबीराची सुरवात मान्यवरांच्या हस्ते करण्यात आली या शिबिरात ११० नेत्ररुग्णांची तपासणी. करुन २० रुग्ण शस्त्रक्रियेसाठी निवडले. वर्षातुन दोन वेळेस हे शिबीर आयोजीत करण्यात येते. गेल्या १८ वर्षाच्या काळात सुमारे २४०० नेत्ररुणांची तपासून १४६० रुणांवर यशस्वी शस्त्रकिया करुन त्यांना दृष्टी देण्याचे काम संस्थेच्या माध्यमातून केले असल्याचेही त्यांनी सागितले.

यावेळी बाळकृष्ण मगर, राजेंद्र गायकवाड, सुभाष करपे, साहेबराव निमसे, दत्तात्रय कोतकर, ज्ञानदेव निमसे, शिरीष निमसे, राजेंद्र लोढे, दत्तात्रय आढाव, अशोक जुंदरे, सुरेश निमसे, संस्थेचे उपाध्यक्ष अशोक शिंदे, किशोर सोनवणे, गिताराम चोथे, बाळासाहेब निमसे, गोपीनाथ जुंदरे, गजानन निमसे, मधुकर सगळगिळे,अशोक गोसावी, अर्चना शिंदे, अनिता मोरे यांच्यासह सभासद, ठेवीदार खातेदार संस्थेच्या सर्व शाखांचे कर्मचारी व ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमची प्रस्तावना व सूत्रसंचालन गिताराम चोथे यांनी केले तर उपस्थितांचे आभार संस्थेचे व्यवस्थापक अनिरुद्ध लोखंडे यांनी मानले.

## सेंट्रल बँकेची दोघांकडून फसवणूक; गुन्हा दाखल

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)**– तालुक्यातील खंडाळा येथील सेंट्रल बँकेत कर्ज घेण्यासाठी तारण ठेवलेल्या कापूस गाठी बदलून त्या जागी कमी दर्जाच्या कापूस गाठी संगनमत करून ठेवून बँकेची कोट्यवधी रूपयांची फसवणूक केली. याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलिसांत दोन जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी खंडाळा येथील सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे शाखाधिकारी विनोद मोहीते यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हंटले आहे की, राहुल सुनील चव्हाण याने सेंट्रल बँकेत ४ कोटीं रुपयाचे कॅश क्रेडिट मिळावे, यासाठी अर्ज केला होता. सदर कर्जासाठी कापूस गाठी तारण ठेवण्याचा करार झाला होता. त्याप्रमाणे त्यासाठी लागणारे सर्व कागदपत्रांची पूर्तता करुन चव्हाण याला २ कोटींचे कॅश क्रेडिट मंजूर करण्यात आले होते. त्यानंतर वेगवेगळ्या प्रकारच्या कागदपत्रांच्या पुर्ततेनंतर कर्जाची रक्कम २ वरून ४ कोटी रुपये करण्यात आली. ठरलेल्या करारनाम्याप्रमाणे मे २०२२ मध्ये चव्हाण याने कापूस गाठी पुणतांबा येथील सेंट्रल वेअर हाऊसमध्ये ठेवल्या. सदर गाठीची गुणवत्ता दर्शवणारी तसेच तत्कालीन बाजारमूल्य दर्शवणारी ई-रिसीट सेंट्रल वेअर हाऊसकडून देण्यात आली. सदर कापूस या उच्च प्रतीच्या असल्याचे प्रमाणपत्र कॉटन असोसिएशन ऑफ इंडिया, औरंगाबाद यांनी दिले होते. सदर वेअर हाऊसमधील ठेवलेल्या मालाची गुणवत्ता अबाधित ठेवण्याची जबाबदारी तेथील वेअर हाऊसचा कर्मचारी राजबिर सिंग याच्यावर होती. मात्र, बँकेने काही कालावधीनंतर कापूस गाठींची तपासणी केली असता सदर कापूस गाठीची गुणवत्ता कर्ज वितरणाच्या वेळी जशी होती, त्यापेक्षा तपासणीच्यावेळी खूपच खालच्या दर्जाची असल्याचे लक्षात आले.

त्यामुळे पुणतांब्याच्या सेंट्रल वेअर हाऊस येथे व्यवस्थापक म्हणून काम करणारा राजविर सिंग याने आणि आरोपी चव्हाण या दोघांनी संगनमत करून बँकेस फसविण्याच्या दृष्टीने कापूस गाठी बदलून त्या ठिकाणी कमी दर्जाच्या कापूस गाठी ठेवत तसेच दिलेल्या कर्जाची अफरातफर केली. असे फिर्यादीत म्हंटले आहे.

याप्रकरणी शाखाधिकारी विनोद मोहीते यांच्या फिर्यादीवरून श्रीरामपूर शहर पोलिसात राहुल चव्हाण आणि राजविर सिंग या दोघांविरुद्ध कोर्टाच्या आदेशान्वये फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास श्रीरामपूर शहर पोलीस करीत आहे.

## मक्तापूर ग्रामस्थांकडून कृषिदूतांचे स्वागत

**नेवासाफाटा (वार्ताहर)**– महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी संलग्न कृषी महाविद्यालय सोनई च्या चतुर्थ वर्षातील विद्यार्थी (कृषिदूत) ग्रामीण कृषी जागरूकता व औद्योगिक कार्यक्रम अंतर्गत दहा आठवडे चालणाऱ्या या कार्यक्रमात शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी नेवासा तालुक्यातील मक्तापूर येथे दाखल झाले.

या कृषीदुतांचे सरपंच सुशीलाताई लहारे, उपसरपंच अलकाताई साळवे, मराठा सुकाणू समितीचे प्रदेशाध्यक्ष गणेश झगरे, माजी सरपंच छबूराव बर्डे, ग्रामविकास अधिकारी डी.व्ही.गरजे, कृषी सेवक अंजली धानापुणे तसेच ग्रामपंचायत कर्मचारी व गावकऱ्यांनी स्वागत केले. कृषी पदवी अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षाचे विद्यार्थी ग्रामीण कृषी जागरूकता हा प्रात्यक्षिक कार्यक्रम राबवणार आहेत.




कृषीदूत नाविन्य रींधे, अभिषेक दरंदले, तेजस पोपेरे, तुकाराम भोये, राहुल सहाणे हे विद्यार्थी गावातील शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणार आहे. या दरम्यान विद्यार्थी प्रत्यक्ष गावात जाऊन प्रथम सर्वेक्षण करून शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणी, शेतकऱ्यांचे जीवनमान, त्यांचा सामाजिक, आर्थिक स्तर, गावातील पीक पद्धती, नैसर्गिक संसाधने अशा विविध गोष्टींचा अभ्यास करणार आहेत. तसेच शेतकऱ्यांना माती परीक्षण व पाणी परीक्षण, विविध पिकांवरील रोग किडींचे व्यवस्थापन, हवामान बद्दल, आधुनिक तंत्रज्ञानाबद्दल हे कृषिदूत माहिती देणार आहेत.

कृषी औद्योगिक कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत शेवटच्या चार आठवड्यात विद्यार्थी कृषी आधारित व्यवसाय किंवा उद्योगांमध्ये प्रत्यक्ष काम करण्याचा अनुभव घेतील. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एच.जी.मोरे, उपप्राचार्य प्रा.एस.व्ही.बोरुडे, कार्यक्रम समन्वयक डॉ. अतुल दरंदले, कार्यक्रमाधिकारी प्रा.जे.एम.वाघमारे, प्रा. आर. एस.गोंधळी, प्रा.आर.टी.दिघे यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

## 'ईव्हीएम' विरोधात स्वाक्षरी मोहीम

### जिल्हा 'वंचित' कडून जनआंदोलनाची हाक

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)**– वंचित बहुजन आघाडीच्या वतीने राज्यभरात 'ईव्हीएम' विरोधी जनआंदोलनाची हाक देण्यात आली आहे. स्वाक्षरी मोहिमेपासून सुरूवात करून टप्पा टप्प्याने हे आंदोलन तीव्र करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर जिल्ह्यातही वंचित बहुजन आघाडी 'ईव्हीएम' विरोधी आंदोलन राज्य महासचिव प्रा. किसन चव्हाण, राज्य प्रवक्ते ॲड. अरूण जाधव, दक्षिण जिल्हाध्यक्ष योगेश साठे यांच्या मार्गदर्शनाखाली होणार आहे.

विधानसभा निवडणुकीनंतर महाराष्ट्रात 'ईव्हीएम' वर संशयाचे वातावरण निर्माण झालेले असताना, पुणे येथे वंचित बहुजन आघाडीच्या राज्य कार्यकारिणी बैठकीत आंदोलनाचा निर्णय घेण्यात आला. ३ डिसेंबर ते १६ डिसेंबर पर्यंत राज्यात 'ईव्हीएम' विरोधी स्वाक्षरी मोहीम राबविण्यात येणार आहे. वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांनी व्हिडिओच्या माध्यमातून राज्यातील मतदारांना ईव्हीएम विरोधात स्वाक्षरी मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. २००४ पासून ॲड. आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली ईव्हीएम विरोधात आंदोलन करण्यात येत आहे. ईव्हीएमच्या विरोधात न्यायालयीन लढाई सुध्दा ते लढत आहेत. पत्रकार परिषदेच्या माध्यमातून ईव्हीएम वापरामधील मधील अनेक घोळ त्यांनी माध्यमासमोर मांडले आहेत. ईव्हीएमच्या विरोधात आरपारची लढाई लढण्याचा निर्णय वंचित बहुजन आघाडीने घेतला असल्याचे जाहीर करण्यात आले आहे.

### बनावट खत निर्मितीच्या कारखान्यावर कृषी विभागाचा छापा

#### नेवासा येथील कारवाईत १६ लाखाचा मुद्देमाल जप्त

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)**– नेवासा तालुक्यातील एका कृषी केंद्रावर कृषी विभागाने छापा टाकून त्याठिकाणी सुरु असलेल्या बनावट खताचा साठा जप्त केला. सुमारे १६ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी नेवासा पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नेवासा तालुक्यातील जय किसान नावाचे हे दुकान कृषी विभागाने सील केले आहे. जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांना मिळालेल्या माहितीनुसार नेवासा तालुक्यातील एका दुकानात बनावट खत निर्मिती होत असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली. त्यानुसार तालुका कृषी अधिकारी धनंजय हिरवे, कृषी अधिकारी प्रताप कोपनर, बाळासाहेब कासार, रखमाजी लांडे, राहुल ठोंबरे, प्रवीण देशमुख, कृषी सहाय्यक दिलीप घोंळवे यांच्या पथकाने छापा टाकून ही कारवाई केली. सदर छाप्यात खत निर्मितीसाठी लागणारे आवश्यक रसायने, खत, रिकाम्या खतांच्या बॅग, बॅग सिलिंग मशिन व इतर साहित्य जप्त करण्यात आले. सदर कृषी केंद्राकडे घाऊक खत विक्रीचा कुठलाही परवाना तसेच उत्पादनाचा परवाना नसल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे कृषी विभागाने सदर दुकान सील केले आहे.

## कुकाणा येथील सय्यद न्यामत बाबा दर्गा उत्सवाची नियोजन बैठक

**नेवासा (तालुका प्रतिनिधी)**– नेवासा तालुक्यातील कुकाणा येथील हजरत सय्यद न्यामत बाबा दर्गा उत्सवाच्या नियोजनासाठी काल मंगळवारी ३ डिसेंबर रोजी पोलीस निरिक्षक धनंजय अ. जाधव यांनी यात्रा कमिटीची बैठक घेतली.

या बैठकीमध्ये अब्दुल हफिस शेख, अमोल अभंग, वसंतराव देशमुख, भाऊसाहेब कोलते, कारभारी गोरडे, विलास देशमुख, इस्माईल शेख, राम जाधव, दौलत देशमुख, बालमभाई शेख, बाळासाहेब कापरे, एकनाथ कापरे, इनूस बालंदर, अरुणकुमार देशमुख, मुसाभाई इनामदार, इकबाल इनामदार, शकूर शेख, रामदास गोल्हार आदी उपस्थित होते.



बैठकीमध्ये स्थानिक नागरिकांनी तरवडी चौकात पोलीस राऊटी उभारणे, दर्ग्याच्या पाठीमागे पोलीस पिंजरा उभा करणे, साध्या वेषात पोलीस नेमणे, डीजे डॉल्बीला परवानगी देऊ नये, तमाशा कार्यक्रमासाठी पोलीस बंदोबस्त देण्यात यावा, मोटर सायकलचे सायलेन्सर काढून मोटर सायकल पळवतात, हगाम्यासाठी चोख बंदोबस्त ठेवण्यात यावा आदी सुचना मांडल्या. स्थानिक यात्रा कमिटी व नागरिकांनी मांडलेल्या सर्व सूचनेवर तातडीने कारवाई करण्याचे आश्वासन दिले.

उत्सव काळामध्ये कोणीही डॉल्बी लावून चादर मिरवणूक काढणार नाही, तसेच मोटर सायकलचे सायलेन्सर काढून कोणीही वाहने पळवणार नाहीत. या बाबतच्या सक्त सूचना पोलिसांनी दिल्या, नियम मोडणाऱ्यांवर सक्त कारवाई करण्यात येणार असल्याचे सुतोवाच पोलीस निरीक्षक जाधव यांनी केले. तसेच छेडछाड, रोमिओगिरी, टिंगल-टवाळी करणाऱ्या मुलांवर कठोर कारवाई करणारे सध्या वेषातील पथक देखील कार्यरत राहणार असल्याचे सांगितले आहे. बैठकीच्या वेळी कुकाणा दूरक्षेत्रातील पोलीस उपनिरीक्षक संदीप ढाकणे, पोलीस नाईक श्री. काळोखे, श्री. गांगुर्डे, पोलीस कॉन्स्टेबल अवी वैद्य, श्री. रसाळ, श्री. फाटक, श्री. महिसमाळे उपस्थित होते.